जा. क्र.आसंउकें/रामेश्वर/397/२०२२
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.
मु. पो. विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक -4/07/२०२२

**प्रति,**

१. मा. तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, देवगड,
ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग.

२. मा. सरपंच,
ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

३. मा. सरपंच,
ग्रामपंचायत कार्यालय, विजयदुर्ग.

४. मा. सरपंच,
ग्रामपचांयत कार्यालय, गिर्ये,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

**विषय:— आंबा संशोधन उपकेंद्र रामेश्वर येथील कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर आंबा कलमांना रिंगा (चरी) मारण्यासाठी व वाहतूक करून खते टाकण्यासाठी इच्छुक ठेकेदारांनी दरपत्रक देण्याबाबत...**

**महाशय,**

आंबा संशोधन उपकेंद्र रामेश्वर, या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील उत्पादनक्षम आंबा कलमांना व इतर आंबा कलमांना रिंगा करणे, पालापाचोळा टाकणे व कार्यालयाच्या भांडारामधून खते वाहतूक करून कलमांना खते टाकून रिंगा बुजवणे इ. कामे करावयाची असुन सादर कामे वेळीच करून देणे आवश्यक आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपण प्रती रिंग काय दराने करू शकाल हे या कार्यालयास विचारलेल्या माहितीसह दि. १४/०७/२०२२ पर्यंत बंद पाकिटातून कळवावे.

आपला विश्वासू

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.

प्रत: नोटीस बोर्ड, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.

# ठेकापध्दतीने करावयाच्या कामासाठीचे शर्ती व अटी

१. ठेक्यातील कामे ही ठेकेदारांनी संबंधीत कृषि पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक यांचे सूचनेनुसार समाधानकारकरित्या करावयाची आहेत.

२. अर्धवट व असामाधानकारक कामाचे देयक पारित केले जाणार नाही

३. प्रक्षेत्रावरील कामे करणेसाठी लागणारी हत्यारे ठेकेदारांनी स्वत: पुरविणेची आहेत.

४. सेंद्रिय खते व रासायनिक खते इत्यादी साधने या कार्यालयाकडून पुरवली जातील.

५. ठेक्याची कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करणे/चालूठेवणे बंधनकारक आहे.

६. ठेक्याची कामे करताना प्रक्षेत्रातील इतर लागवड व इमारतीला इजा/नुकसान झाल्यास त्यांची भरपाई करुन घेतली जाईल.

७. ठेक्याच्या कामगारांना काम करताना अपघात किंवा इजा झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदरावर राहील.

८. ठेक्यातील कामगारांना भविष्यात विद्यापीठ सेवेत सामावुन घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

९. ठेक्याचे काम समाधनकारक रित्या झाल्यानंतर चालू कामाचे /पूर्ण कामाचे कामाच्या प्रमाणात देयक या कार्यालयाकडून प्रत्येक महिन्याच्या १५ ते २० व १ ते ५ तारखेदरम्यान अदा करण्यात येईल.

१०. आर्थिक वर्षात आपले उत्पन्न प्रमाणित उत्पन्नापेक्षा अधिक असल्यास आपणांस नियमानुसार टी. डी. एस. व आयकर भरावा लागेल.

११. कामाच्या स्वरुपामध्ये परिस्थितीनुरुप बदल करावयाचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत.

१२. एक किंवा सर्व दरपत्रके स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत

**उद्यानविद्यावेत्ता**
**आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,**
**ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.**